ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २८ | पुणें, बुधवार तारीख ५ सप्टेंबर, १९६२ | अंक १७

## विविध माहिती

**नव्या रशियन उपग्रहांचें महत्त्व**—रशियानें अंतराळांत सोडलेल्या दोन उपग्रहांबद्दल जगांतील शास्त्रज्ञांनीं अनेक तर्क केले आहेत. जवळ जवळ भ्रमण करणाऱ्या ह्या उपग्रहांमुळें चंद्रावर जाऊन पोंचण्याचें माणसाचें स्वप्न अधिक नजीक आलें आहे, असें ब्रिटिश शास्त्रज्ञांचें मत आहे. पृथ्वीभोंवतीं फिरत असतांनाच चंद्रावर जाणाऱ्या उपग्रहाला लागणारें इंधन भरून घेतां येण्याची शक्यता त्यांनीं ध्वनित केली आहे.

**बँकांमधील तंट्याबाबत सल्ला**—मध्यवर्ती सरकारचे मजूर-मंत्री श्री. जयसुखलाल हाथी ह्यांनीं अशी सूचना केली आहे कीं बँका व त्यांचे चालक ह्यांच्यामधील तंटे मिटविण्यासाठी प्रत्येक बँकेंत एका कमिटीची स्थापना करण्यांत यावी. नैनीताल येथील मजूर परिषदेंत तयार करण्यांत आलेल्या आचारसंहितेप्रमाणें भांडणें वाटाघाटी करून मिटवावींत असा सल्ला त्यांनीं दिला.

**गुजरातमधील तेलाच्या नळाचें काम**—गुजरातमधील तेलाच्या खाणींच्या विभागांतील तेलाचे नळ घालण्याचें काम भारत सरकारनें एका इटालिअन कंपनीकडे सोंपविलें आहे. ही कंपनी इटालीच्या सरकारच्या मालकीची आहे. हीच कंपनी बडोद्याजवळ कोयाली येथें काढण्यांत यावयाच्या तेलशुद्धीच्या कारखान्याच्या उभारणीचेंहि काम करणार आहे.

**बनावट औषधांचा प्रश्न**—पश्चिम बंगाल सरकारच्या आरोग्यखात्याचे संचालक श्री. डी. एन. चक्रवर्ती ह्यांनीं असें सुचविलें आहे कीं, औषधांच्या बाजारांत विकली जाणारीं बनावट व कमी दर्जाचीं औषधें विकलीं जाऊं नयेत म्हणून एक मध्यवर्ती चांचणी केंद्र व एक मध्यवर्ती विक्री-संघटना स्थापन करण्यांत यावी; औषधांची तपासणी करण्याचा खर्च सरकारनें व औषधांच्या कारखानदारांनीं सोसावा.

**गैरव्यवहार करणाऱ्या कंपन्या**—एप्रिल ते जून ह्या कालावधींत २२ कंपन्या व व्यापारी ह्यांचीं नांवें काळ्या यादींत घालण्यांत आलीं. आयात-निर्यातीबाबतचे परवाने मिळविण्याच्या कामीं त्यांनीं गैर उपायांचा वापर केला होता. ह्याच काळांत ३१ सरकारी नोकरांना व ८ खाजगी व्यक्तींना लांचलुचपतीबद्दल सक्तमजुरीच्या व दंडाच्या शिक्षा देण्यांत आल्या.

**विजेचे दर वाढण्याची शक्यता**—गुजरात वीज-बोर्डाची तूट वाढत असल्यामुळें बोर्डानें गुजरात सरकारला विजेचे दर वाढण्याची शक्यता आहे असें कळविलें आहे. दर वाढूं नयेत असें सरकारला वाटत असेल तर सरकारनें ३० लाख रुपयांची मदत बोर्डाला द्यावी अगर सरकारनें बोर्डाला दिलेल्या कर्जावरील व्याजाचे दर कमी करावेत, असेंहि सुचविण्यांत आलें आहे.

**चलनवाढीबद्दलचा दृष्टिकोण**—महाराष्ट्र राज्य सरकारचे अर्थमंत्री श्री. स. गो बर्वे नागपूर येथें बोलतांना म्हणाले कीं, सध्यांच्या आर्थिक परिस्थितींत चलनवाढीचा दाब आहे ही गोष्ट खरी; पण त्याचें कारण राष्ट्रीय विकासाच्या कामावर खर्च करण्यांत आलेल्या पैशाचें फळ अद्याप मिळूं लागलेलें नाहीं हें आहे. फळें पदरांत पडूं लागण्यास कांहीं वर्षें जावीं लागणारच.

**आंध्र प्रदेशांतील पूरनियंत्रण**—आंध्र प्रदेश सरकारनें राज्यांत अमलांत आणावयाच्या ५ पूरनियंत्रण योजना मध्यवर्ती सरकारला सादर केलेल्या आहेत. ह्या सर्व योजनांना मिळून ४·९२ कोटी रुपये खर्च येणार आहे. ह्या योजना लवकर मंजूर करून त्या कामीं आर्थिक मदतहि देण्यांत यावी अशी मागणी राज्यातर्फे करण्यांत आली आहे.

**प्राणवायूच्या पुरवठ्याशिवाय गिर्यारोहण**—जम्मूपासून २२० मैलांवर असलेल्या हिमालयाच्या एका शिखरावर आरोहण करण्याचा प्रयत्न तीन शेर्पांनीं केला. विशेष म्हणजे २०,००० फूट उंचीवर जाईपर्यंत त्यांनीं प्राणवायूच्या पुरवठ्याचा उपयोग केला नाहीं. त्यांचा पोशाखहि साध्या लोकरीचा होता. गिर्यारोहणासाठी निवडलेल्या शिखराची उंची २४,००० फूट होती.

**विद्यार्थ्यांच्या पोशाखावर नियंत्रण**— कराचींतील विद्यार्थ्यांना—विशेषतः विद्यार्थिनींना—तंग कपडे घालून आत वावरतां येणार नाहीं. पाकिस्तानच्या शिक्षणखात्यानें अशा पोशाखाला बंदी घातली आहे. सामाजिक समारंभप्रसंगीं मुलींनीं अशा प्रकारचे पोशाख घालून गायन अगर नृत्य करूं नये, असा हुकूम ह्यापूर्वीच काढण्यांत आला आहे.

**विद्यार्थ्यांच्या प्रवासाला उत्तेजन**—विद्यार्थ्यांना प्रवास करण्यास उत्तेजन देण्यासाठी भारत सरकारनें १,८२,००० रुपये मंजूर केले असून ही रक्कम सर्व राज्यांना वाटून देण्यांत येणार आहे. विद्यार्थ्यांनीं शैक्षणिक दृष्ट्या महत्त्वाचे प्रवास करावे अशी सरकारची इच्छा आहे. ऐतिहासिक स्थळें, निसर्गरम्य ठिकाणें, सांस्कृतिक महत्त्वाचीं ठिकाणें, नव्या विकासयोजना, ह्यांना भेटी देणें विद्यार्थ्यांना सुलभ व्हावें म्हणून हा उपक्रम करण्यांत आला आहे.

**वाढत्या लोकसंख्येचा धोका**—कलकत्ता येथें मध्यवर्ती कुटुंबनियोजन मंडळाची १३ वी बैठक भरली होती. बैठकींत भाषण करतांना मध्यवर्ती सरकारच्या आरोग्यमंत्री डॉ. सुशिला नायर ह्यांनीं जननाच्या प्रमाणांत ५० टक्के घट घडविण्याची आवश्यकता आहे असें सांगितलें. भारताची लोकसंख्या १९७६ मध्यें ६२ कोटींवर जाईल, असा त्यांचा अंदाज आहे.

**कॅनडा भारताची साखर घेणार**—भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशननें कॅनडाशीं साखर पुरवठ्याबाबत करार केला आहे. कराराप्रमाणें १९६३ सालीं भारत कॅनडाला १ लाख टन साखर पुरवील. साखरेची किंमत आंतरराष्ट्रीय किंमतींना अनुसरून ठरविण्यांत येईल. साखर विकून मिळणाऱ्या रकमेपैकी निम्म्या रकमेचा उपयोग कॅनडाकडून वृत्तपत्रांना लागणारा कागद, कागदासाठी लागणारा लगदा, खतें, इत्यादि माल घेण्यासाठी करण्यांत येईल.


**भूमिहीनांचें पुनर्वसन**—पहिल्या व दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत बिहारमध्यें २,५०,००० एकर पडीक जमीन लागवडीखालीं आणण्यांत आली. त्यांपैकी २,२५,००० एकर जमीन चांगल्या मगदुराची असून त्यांत चांगलीं पिकें काढण्यांत आलीं. ९४,००० भूमिहीन कुटुंबांचें १,२५,००० एकर जमिनींत पुनर्वसन करण्यांत आलें.

**स्टेट ट्रॅन्सपोर्टसाठी मध्यवर्ती संघटना**—निरनिराळ्या राज्यांतील स्टेट ट्रॅन्सपोर्ट संघटनांत एकसूत्रीपणा आणण्याच्या दृष्टीनें एक मध्यवर्ती संघटना स्थापन करण्याचा विचार चालू आहे. प्रारंभीं राज्यांतील संघटनांना लागणारी खरेदी एकत्रित करण्याच्या दृष्टीनें पावलें टाकण्यांत येतील व नंतर हळूहळू कामाची व्याप्ति वाढविण्यांत येईल. सध्यां निरनिराळ्या स्टेट-ट्रॅन्सपोर्ट संघटनांच्या सुमारें २५,००० गाड्या आहेत.

**पेट्रोलच्या पदार्थांच्या आयातींत कपात**—ज्या देशांचें परदेशीय चलन निर्बंधयुक्त आहे अशा देशांकडून आयात करण्यांत येणाऱ्या पेट्रोलच्या पदार्थांच्या आयातींत एप्रिल ते सप्टेंबर १९६२ ह्या सहामाहींत ३ कोटी रुपयांची कपात करण्याचें भारत-सरकारनें ठरविलें आहे. ह्या कपातीमुळें औद्योगिक कारखान्यावर परिणाम होण्याची शक्यता नाहीं. देशांतर्गत तेल-शुद्धीच्या कारखान्यांतील उत्पादन वाढविण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे.

**नव्या प्रकारचीं रेल्वे एंजिनें**—ब्रिटनमध्यें दोन नव्या प्रकारच्या रेल्वे एंजिनांची बांधणी करण्यांत आली आहे. त्यांपैकी एक गॅस टर्बाइनच्या साह्यानें धांवतें व दुसरें मेथेन गॅसच्या साह्यानें धांवतें. दुसऱ्या प्रकारचें एंजिन हें जगांतील तसलें पहिलेंच एंजिन आहे. पहिल्या प्रकारच्या एंजिनाची चांचणी घेण्यांत आली असतां तें खर्चाच्या दृष्टीनें यशस्वी झाल्याचें दिसून आलें.

**अणुस्फोटामुळें दूध विषारी झालें**—अमेरिकेच्या आरोग्य-खात्यानें अशी माहिती जाहीर केली आहे कीं, अमेरिकेंतील दुधावर अणुस्फोटांचा परिणाम झाला असून त्यामधील विषारी आयोडिनचें प्रमाण पूर्वीपेक्षा एकतृतीयांशानें अधिक झालें आहे. त्यांतल्या त्यांत पश्चिम अमेरिकेंतील दुधावर विशेष परिणाम झाला आहे. नेव्हाडामध्यें अमेरिकेनें चालविलेल्या प्रायोगिक अणुस्फोटाचें हें फळ आहे.

थेंबें थेंबें तळें साचे....

उसाच्या चिपाडांत शिल्लक राहिलेल्या शेवटल्या रसाच्या थेंबांचें सुद्धा तळें होऊं शकतें आणि त्यांतून तुमचा अधिक फायदा होऊं शकतो. म्हणूनच उसांतून शेवटल्या थेंबापर्यंत रस काढून घेणारे 'किर्लोस्कर' उसांचे चरक वापरून तुमचा पुरेपूर फायदा करून घ्या


वर्षानुवर्ष बिनतक्रार काम देण्याच्या दृष्टीनेंच त्यांची रचना केलेली असते

५, १० व १५ हॉर्सपॉवरचे आणि २, ४ व ६ बैलांकडून चालणारे असे निरनिराळ्या आकारांतील चरक तयार होतात.



किर्लोस्कर

पॉवरवर चालणारा उसाचा चरक



किर्लोस्कर ब्रदर्स लिमिटेड

किर्लोस्करवाडी, जि. सांगली.

# अर्थ

बुधवार, ता. ५ सप्टेंबर, १९६२





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## देशाची अर्थव्यवस्था अगतिक झाली आहे !

फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संघटनेचे अध्यक्ष श्री. जैन् ह्यांनीं बडोदा येथील रोटरी क्लब-पुढें भाषण करतांना देशाची अर्थव्यवस्था अगतिक झाली असल्याचा इषारा दिला आहे. ते आपल्या भाषणांत म्हणाले कीं, तिसऱ्या पचवार्षिक योजनेची सुरुवात निराशाजनक आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेची प्रगति वेळापत्रकाप्रमाणें होत नाहीं असें दिसूं लागलें आहे. नियोजित कार्यक्रम पूर्णपणें अमलांत आणल्याचें समाधानच केवळ मिळविण्यासाठीं आर्थिक जीवनाचें नियोजन करावयाचें नसतें. हाताशीं असलेल्या साधनसंपत्तीचा बुद्धीला पटण्यासारखा उपयोग करून जास्तींत जास्त आर्थिक प्रगति करणें हा आर्थिक नियोजनाचा उद्देश असला पाहिजे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पहिल्या १५ महिन्यांवर ह्या दृष्टि-कोणांतून नजर टाकल्यास निराशाच पदरीं पडते. भारताची अर्थ-व्यवस्था आतां अशा अवस्थेला आली आहे कीं, येथून पुढें प्रगति होणें कठीण आहे. योग्य दिशेनें ताबडतोब उपाययोजना करण्यांत आली नाहीं तर तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ठरविण्यांत आलेलीं उत्पादनाचीं उद्दिष्टें गांठतां येणें शक्य होणार नाहीं. तिसऱ्या पंच-वार्षिक कार्यक्रमांत ठरविण्यांत आलेलीं उद्दिष्टें आणखी वाढ-विण्याचा विचार नियोजन मंडळ करीत आहे. निरनिराळया उद्योग-धंद्यांतील उत्पादनाच्या वेगवेगळ्या वेगाची नीट सांगड घालण्यांत आली आणि उत्पादन वाढविण्याला पुरेशीं प्रलोभनें दाखविण्यांत आलीं तर तिसरा पंचवार्षिक कार्यक्रम पुरा करणें अजूनहि शक्य आहे. अर्थव्यवस्थेंत मोक्याच्या जागीं असलेल्या उद्योगधंद्यांचा विकास घडवून आणला पाहिजे. हा विकास जर जलदीनें घडवून आणला नाहीं तर सर्वच अर्थव्यवस्थेच्या विकासाचा वेग मंदावल्या-शिवाय राहणार नाहीं. अलीकडे मोक्याचे उद्योगधंदे मंदावले आहेत.

## ओरिसा राज्यांतील शेतकी विद्यापीठ

ओरिसा राज्य सरकारनें एका शेतकी विद्यापीठाची स्थापना केली आहे. राधाकृष्णन् कमिशननें केलेल्या शिफारशींना अनुसरून ह्या विद्यापीठांतील शिक्षण-पद्धति ठरविण्यांत आली आहे विद्यापीठाचा कारभार चालविण्यासाठीं छोट्या बोर्डाची योजना करण्यांत आली आहे, व त्याला पुरेसे अधिकार देण्यांत आले आहेत. विद्यापीठाच्या उद्घाटनाचा समारंभ अमेरिकेचे भारतामधील वकील मि. गालब्रेथ ह्यांच्या हस्तें करण्यांत आला. ह्या प्रसंगीं बोलतांना ते म्हणाले कीं, शेतकी विद्यापीठासारख्या संस्थांना अमेरिकेच्या पब्लिक लॉ ४८० प्रमाणें उदार मदत मिळण्यास अडचण पडणार नाहीं. भारतामधील उच्च शिक्षणाच्या क्षेत्रांत ह्या विद्यापीठाची स्थापना महत्त्वाची ठरल्याशिवाय राहणार नाहीं. विद्यापीठांत शिक्षणाची जी पद्धत घालून देण्यांत येईल तीमुळें विद्यार्थ्यांना शेतकऱ्यांत मिळून-मिसळून काम करण्याची संधि मिळेल. अर्थात त्यामुळें अधिक चांगलीं पिकें काढण्याच्या शेतकऱ्यांच्या प्रयत्नांत मोलाची मदत मिळूं लागेल. भारतामधील शेतीच्या उत्पादनावर अनुकूल परिणाम घडविण्याच्या दृष्टीनें अशा विद्यापीठांचें महत्त्व असाधारण आहे. ओरिसामधील हें शेतकी विद्यापीठ अशा प्रकारचें पांचवें विद्यापीठ आहे. अमेरिकेंतील मिसोरी विद्यापीठाची ह्या विद्यापीठाला मदत मिळणार आहे. मिसोरी विद्यापीठांतील कांहीं शिक्षक व तंत्रज्ञ प्रत्यक्ष शिकवण्याचें काम करणार असून, त्याशिवाय ४० हिंदी विद्यार्थ्यांना अमेरिकेंत शिकवून तयार करण्यांत येणार आहे. ओरिसा विद्यापीठांतील विद्यार्थी व शिक्षक शेतकऱ्यांत मिसळून काम करणार असल्यामुळें शेतकऱ्यांच्या खऱ्याखुऱ्या प्रश्नांची त्यांना चांगली माहिती होईल. त्याचबरोबर शेतीच्या व्यवसायांतील आधुनिक शोध शेतकऱ्यां-पर्यंत पोहोचविण्याचें कामहि सुलभ होईल.

## खनिज तेलाच्या शोधाचे आणखी प्रयत्न

मध्यवर्ती सरकारच्या खाणी व इंधन खात्याचे मंत्री श्री. के. डी. मालवीय ह्यांनीं लोकसभेच्या कॉंग्रेस पक्षाच्या बैठकींत बोल-तांना असें सांगितलें कीं, तेलशुद्धीच्या क्षेत्रांतील ४ था कारखाना दक्षिण भारतांत काढण्यांत यावा अशी सरकारची इच्छा आहे. देशांतील तेलाच्या शोधाविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं, नवीन तेलशुद्धीचे कारखाने काढावयाचे म्हटलें कीं, परदेशीय चलनाचा प्रश्न उत्पन्न होणारच. तथापि, प्रत्येक कारखान्याच्या उभारणी-बरोबरच भविष्यकालांत परदेशीय चलनाची बचत करण्याची शक्यता निर्माण होते हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे. दक्षिण भारतांत कावेरी नदीच्या खोऱ्यांत खनिज तेलाचा शोध करण्यासंबंधीं कांहीं प्रगति करण्यांत आली आहे. पुढील हिवाळ्यांत ह्या भागांत तेलाच्या विहिरी खोदण्याच्या कामास प्रारंभ केला जाईल, असें वाटतें. ह्या कामीं परदेशीय तज्ज्ञांचें सहकार्य मिळविण्याची खटपट चालू आहे. परंतु तें न मिळाल्यास सरकारचें तेल आणि नैसर्गिक वायु-मंडळ हें काम आपल्याकडे घेईल. भारतामधील तेलाच्या उत्पादनाचा विचार करतां तिसऱ्या पंचवार्षिक कार्य-क्रमाच्या अखेरीस ५० लाख टन तेलाचें उत्पादन होईल असा अंदाज आहे. तसें झाल्यास ७० कोटी रुपयांच्या परदेशीय चलनाची बचत होईल. दैवयोगानें कोठेंतरी तेलाच्या मोठ्या सांठ्याचा शोध लागल्यास तेलाबाबत भारत स्वतंत्र होण्याचीहि शक्यता आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस देशां-तील तेलाचा खप १.४ कोटी टनांपर्यंत जाण्याचा संभव आहे. कांहीं तज्ज्ञांच्या मतानें तेलाचा खप १.७ कोटी टनापर्यंत जाण्याचीहि शक्यता आहे. तसें झाल्यास तेलाच्या आयातीचें प्रमाण वाढवावें लागेल. दरम्यान राजस्थानांत व गंगेच्या खोऱ्यांत तेलाचा शोध जारीनें करण्यांत येणार आहे.

## नगर डि. अ. सं. को. बँकेची बेलापूर टाऊन शाखा

नगर डिस्ट्रिक्ट अर्बन सं. को. बँकेच्या बेलापूर टाऊन शाखेचें उद्घाटन गुरुवार, दि. १६ ऑगस्ट रोजीं सहकार खात्याचे उप-मंत्री श्री. खताळ यांच्या हस्तें झालें.

## " शेतकरी हा व्यापारी आणि कारखानदार झाला पाहिजे "

दि. ६ ऑगस्ट, १९६२ रोजीं खेड, जिल्हा पुणें, येथें खेड तालुका सहकारी खरेदी–विक्री संघानें बांधलेल्या इमारतीचें व गुदामाचें उद्घाटन मा. नामदार यशवंतरावजी चव्हाण, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे हस्तें झालें. आपल्या भाषणांत मा. नामदार यशवंतरावजी चव्हाण म्हणाले: - " शेतकरी हा फक्त शेतकरीच राहून उपयोगी नाहीं, तर तो व्यापारी आणि कारखानदारहि झाला पाहिजे. त्याशिवाय त्याचा सर्वांगीण विकास होणार नाहीं. ऊस पिकविणारे शेतकरी आतां व्यापारी आणि कारखानदार झाले आहेत, त्यामुळें त्यांना सुखाचे दिवस येऊं लागले आहेत. तीच गोष्ट इतर शेतकऱ्यांच्या बाबतींत झाली पाहिजे. शेतकरी आपल्या हंगामांत उत्पादन केलेला माल बाजारांत व्यापाऱ्यांकडे नेतो त्या वेळीं व्यापारी मागेल त्या भावांत त्याला आपला माल विकावा लागतो. तसेंच ज्या वेळीं तो व्यापाऱ्यांकडून वस्तु अगर माल विकत घेतो त्याहि वेळीं व्यापारी सांगेल तीच किंमत त्याला द्यावी लागते. शेतकऱ्याला स्वत: उत्पादन केलेल्या मालाची किंमत स्वत: ठरविण्याचेंहि स्वातंत्र्य नाहीं. मालाच्या खरेदी-विक्रीची ही तऱ्हा अजब आहे. आपल्या मालाला खात्रीशीर भाव मिळविण्यासाठी तरी शेतकऱ्यांनीं बहुसंख्येनें सहकारी चळवळींत सामील झालें पाहिजे."

## स्त्रियांनीं चालविलेली बँकेची शाखा

कॅनडा इंडस्ट्रिअल अँड बँकिंग सिंडिकेटनें बंगलोरमधील आपली एक शाखा सर्वस्वीं स्त्रीनोकरांच्या साह्यानें चालविण्याचें ठरविलें आहे. ह्या शाखेंत सध्यां ९ स्त्रिया कामें करीत आहेतच; त्यांतच आणखी ६ स्त्रियांची भर घालून ही शाखा चालविण्यांत येणार आहे. शाखेचा मुख्य अधिकारी म्हणून काम करणाऱ्या स्त्री-अधिकाऱ्याला शिक्षण देण्यांत आलें आहे. हा प्रयोग यशस्वी झाला तर अशाच पद्धतीवर मंगलोर, मुंबई आणि मद्रास ह्या शहरांतून शाखा काढण्यांत येणार आहेत. स्त्रियांकडून अधिक प्रमाणांत ठेवी मिळविण्यासाठी हा प्रयोग करण्यांत येत असावा. शाखेंतील स्त्रीनोकरांची वृत्तपत्रप्रतिनिधींना मुद्दाम ओळख करून देण्यांत आली. भारतांत अशा प्रकारचा हा पहिलाच प्रयोग आहे.

## शिवण्याच्या यंत्रांची निर्गत घटूं लागली

भारतांत तयार होणाऱ्या शिवण्याच्या यंत्रांची निर्गत घटूं लागली आहे. खालील तक्त्यांत निर्गत झालेलीं शिवण्याचीं यंत्रें व सुटे भाग, ह्यांची किंमत दिली आहे. आंकडे हजार रुपयांचे आहेत.

| कुठें निर्गत ! | १९६० | १९६१ |
|---|---|---|
| ईजिप्त | २२,३१ | ४,२६ |
| ग्रेट ब्रिटन | ९,४७ | १,३५ |
| सिलोन | ४,६९ | १,२० |
| थायलँड | ७२ | ५८ |
| अफगाणिस्तान | २,०१ | १६ |
| इराक | ७८ | ९ |

निर्गतीचे १९५८ ते १९६१ आंकडे खाली दिले आहेत.

| | रु. |
|---|---|
| १९५८ | १४,६२,००० |
| १९५९ | ३०,७०,००० |
| १९६० | ५५,३०,००० |
| १९६१ | ३९,८३,००० |

## वीजग्राहकांचा संघटित विरोध

सांगलीपासून १५ मैलांवर असलेल्या तासगांवच्या ९९ टक्के वीजग्राहकांनीं एक दिवस विजेचा वापर केला नाहीं. तासगांवच्या वीज कंपनीनें विजेचे दर निम्म्यानें कमी करावेत असें त्यांचें म्हणणें आहे. सध्यां कंपनी प्रत्येक युनिटला ६२ नये पैसे आकारीत आहे. तासगांवच्या आसपासच्या भागांत विजेचा दर युनिटला ३१ नये पैसे असा आहे. तासगांवच्या नगरपालिकेला रस्त्यावरील विजेच्या दिव्यासाठी दरसाल १७,००० रुपये द्यावे लागतात. दिव्यांसाठी नगरपालिकेनें दरसाल १०,००० रुपयांपेक्षा अधिक रक्कम देऊं नये, असा ठराव विजेच्या दराबद्दल भरविण्यांत आलेल्या एका जाहीर सभेंत मंजूर करण्यांत आला. विजेचे दर कमी करण्यांत आले नाहींत तर चळवळ करण्याचा विचार नागरिक करीत आहेत. अमेरिकेंत ग्राहकांच्या संघटना असतात. भारतांत अशा प्रकारच्या संघटना नाहींत.

## योगिक साधनानें हृदयक्रिया बंद करतां येत नाहीं

कांहीं योगी योगबलानें स्वत:ची हृदयक्रिया पूर्णपणें बंद पाडूनहि जिवंत राहूं शकतात असा दावा करण्यांत येत असतो. राज्यसभेंत ह्यासंबंधी प्रश्नोत्तरें झालीं. त्यावेळीं मध्यवर्ती सरकारच्या आरोग्यमंत्री डॉ. सुशिला नायर म्हणाल्या कीं, असा दावा करणाऱ्या कांहीं जणांची समाधीच्या अवस्थेंत आधुनिक उपकरणांनीं तपासणी करण्यांत आली असतां त्यांचें हृदय संपूर्णपणें बंद पडत नसल्याचें आढळून आलें. तथापि अशा स्थितींत त्यांना वेदनांचें ज्ञानमात्र बराच वेळ होत नाहीं असें दिसून आलें. भू-समाधीच्या अवस्थेंत राहण्याचा प्रयोग करणाऱ्या कांहीं जणांची हवाबंद पेटींत चांचणी घेण्यांत आली. चांचणींत असें आढळून आलें कीं, सामान्य परिस्थितींत माणसाला जितका प्राणवायु लागतो त्यापेक्षां बऱ्याच कमी प्राणवायूवर योग्यांना निभवतां येतें.

## नांगल येथील जड पाण्याचा कारखाना

नांगल येथील जड पाण्याचा कारखाना सुरू करण्यांत आला आहे. भारतांत जड पाणी व्यापारी प्रमाणावर तयार करण्याची ही पहिलीच वेळ आहे. कारखाना उभारण्यासाठीं यंत्रसामग्री व इमारती मिळून २ कोटी रुपये खर्च आला आहे. फर्टिलायझर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ह्या संघटनेतर्फे तो उभारण्यांत आला आहे. त्यांतून दरसाल १५ टन वजनाचें जड पाणी उत्पादन करण्यांत येईल. त्याची किंमत सुमारें ४५ लाख रुपये होईल. कारखान्याची उभारणी करण्याच्या कामी जर्मन तंत्रज्ञांची मदत घेण्यांत आली होती. आतां थोड्या जर्मन निरीक्षकांच्या सहकार्यानें सर्व कारखाना भारतीय तंत्रज्ञ चालवीत आहेत. भारतांत उभारण्यांत येणाऱ्या अणुशक्तीकेंद्रांत ह्या पाण्याचा उपयोग करण्यांत येणार आहे.

## रेल्वेसाठी जपानी एंजिनें

जपानमधील मिटसुबिशी इलेक्ट्रिक कंपनीच्या गटाकडे भारतीय रेल्वेनें १८ विजेच्या रेल्वे एंजिनांची मागणी नोंदविली आहे. कलकत्ता येथें हीं एंजिनें पुरविणाऱ्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांकडून टेंडर्स आलीं होतीं. ह्या स्पर्धेत अखेर जपानी कंपनीला यश आलें. एंजिनांची एकूण किंमत सुमारें १·५ कोटी रुपये होईल. त्यापैकीं ३० टक्के किंमत पुरवठ्याचा करार झाल्यावर, ६० टक्के जपानकडून एंजिनें बोटीवर चढविण्याच्या वेळीं आणि १० टक्के एंजिनांची चांचणी झाल्यावर देण्यांत येणार आहे.

## सहकारी बँकांतील ठेवी वाढविण्याबद्दलचे उपाय

### महाराष्ट्राचें उदाहरण समोर ठेवण्याची राज्यांना शिफारस

सहकारी बँकांकडील ठेवी आणि सर्वसाधारणपणें त्यांचें उत्पन्न वाढविण्यासाठी खास उपाय योजण्याचें महत्त्व विशद करणारें एक परिपत्रक मध्यवर्ती समाज विकास, पंचायत राज्य आणि सहकार खात्यानें राज्य सरकारांकडे पाठविलें आहे. या बँकांतील ठेवी वाढविण्याकरितां महाराष्ट्र सरकारनें योजलेले उपाय आणि त्या राज्य सरकारच्या सहकार खात्यानें दिलेल्या विविध सवलती यांचा या संदर्भात विशेष अभ्यास करण्यांत यावा अशीहि सूचना सदर परिपत्रकांत करण्यांत आली आहे.

महाराष्ट्र सरकारच्या सहकार खात्यानें इतर अनेक गोष्टींबरोबरच नगरपालिका, जिल्हा बोर्डें, स्कूल बोर्डें आणि शाळा समित्या यांसारख्या स्थानिक संस्थांस 'अ' आणि 'ब' वर्गीय मध्यवर्ती सहकारी बँकांत आपल्याकडील शिल्लक ठेवण्याची परवानगी दिली आहे.

तसेंच महाराष्ट्र स्टेट कोऑपरेटिव्ह बँकेनें आपलें उत्पन्न वाढविण्यासाठी चालू केलेल्या मासिक आवर्तक ठेवींची योजना आणि कॅश सर्टिफिकिटांची योजना यांच्याकडेहि इतर राज्य सरकारांचें लक्ष वेधण्यांत आलें आहे.

### नाशिक जिल्हा बँकेचा उपक्रम

नाशिक डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेनें आपल्या मालेगांव शाखेंत चालू केलेल्या "अल्प ठेव योजनेचा" या परिपत्रकांत खास निर्देश करण्यांत आला आहे. मालेगांव हें कापडनिर्मितीचें केंद्र असल्यानें त्या विभागांतील औद्योगिक कामगारांची मोठी संख्या लक्षांत घेऊन या शाखेनें दररोज २५ नये पैसे ठेव म्हणून गोळा करण्याची योजना चालू केली आहे. ही ठेव पांच वर्षें पुरी झाल्यावर परत मिळते व त्यावर दरसाल दरशेंकडा ३ दरानें व्याज देण्यांत येतें. कांहीं थोड्या महिन्यांत या योजनेखालील खात्यांची संख्या सुमारें ८०० झाली.

अशा रीतीनें महाराष्ट्र सरकारनें योजलेल्या विविध उपायांमुळें त्या राज्यांतील मध्यवर्ती सहकारी बँकांकडील एकूण ठेवींची रक्कम १९५५-५६ च्या अखेरीस ७.८२ कोटी रुपये होती ती १९६०-६१ च्या अखेरीस २५.८२ कोटी रुपयांवर गेली असहि या परिपत्रकांत म्हटलें आहे.

---

## कंपन्यांच्या संख्येच्या बाबतींत महाराष्ट्राचा भारतांत दुसरा क्रमांक

भारतांत असलेल्या कंपन्यांपैकी सर्वांत अधिक कंपन्या पश्चिम बंगालमध्यें असून त्याखालोखाल महाराष्ट्र आणि मद्रास या राज्यांचा क्रम लागतो. ३१ मार्च, १९६२ च्या अखेरीपर्यंतच्या कालांत प. बंगालमध्यें ८९११, महाराष्ट्रांत ५२९८ व मद्रास राज्यांत २९७१ कंपन्या असल्याचें, कंपनी कायदा प्रशासन खात्याच्या संशोधन आणि आंकडेवारी विभागानें याबाबत केलेल्या पाहणींत दिसून येतें. कंपन्यांचा जिल्ह्यानिहाय विचार करतां कलकत्ता जिल्ह्यांत सर्वांत अधिक म्हणजे ७९२५ आणि बृहन्मुंबईंत ४५५७ व मद्रास जिल्ह्यांत १०३३ कंपन्या होत्या. एकूण ३६ जिल्ह्यांत प्रत्येकी १०० हून अधिक कंपन्या असल्याचेंहि या पाहणींत आढळून आलें आहे.

---

## भारताच्या साखरेची जपानला निर्यात

भारत आणि जपान ह्यांच्या दरम्यान कच्च्या साखरेच्या निर्यातीसंबंधीं तीन वर्षें मुदतीचा करार करण्यांत आला आहे. भारताची साखर जपानच्या बाजारपेठेंत धाडण्याची ही पहिलीच वेळ आहे. कराराप्रमाणें भारत जपानला दरसाल १,५०,००० टन कच्ची साखर निर्यात करणार आहे. निर्यातीची सुरुवात येत्या हंगामापासून करण्यांत येईल. जपानच्या साखरेच्या कारखान्यांना कच्ची साखर पुरविणाऱ्या एका अमेरिकन कंपनीनें भारताच्या स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशनबरोबर वरील करार केला आहे. जपान पांढरी साखर कधींच आयात करीत नाहीं. जपानला लागणारी सर्व साखर परदेशांतून आयात करावी लागते व ती सर्वच्या सर्व कच्च्या स्वरूपांत करण्यांत येते. जपानला दरसाल १० लाख टन कच्ची साखर आयात करावी लागते. हा सर्व पुरवठा मुख्यत्वेंकरून फॉर्मोसा, क्यूबा, ऑस्ट्रेलिया ह्या देशांकडून करण्यांत येतो. कच्च्या साखरेपासून पांढरी साखर तयार करणाऱ्या जपानी कारखान्यांची एक मध्यवर्ती संघटना आहे. ह्या संघटनेनें असा निर्णय घेतला आहे कीं, भौगोलिक दृष्ट्या जवळ असलेल्या देशांकडूनच कच्ची साखर आयात करण्यांत यावी. भारत, ऑस्ट्रेलियासारख्या देशांशीं पुरवठ्यासंबंधीं दीर्घ मुदतीचे करार करण्यांत आले तर आयातीचें प्रमाण व साखरेची किंमत ह्या दोन्ही बाबतींत स्थैर्य राखतां येईल अशी संघटनेची अपेक्षा आहे. म्हणून क्यूबासारख्या दूर असलेल्या देशांकडून साखर आयात करण्याचें तूर्त थांबविण्यांत येणार आहे. ह्या निर्णयामुळें क्यूबा, ब्राझील, पोलंड, फ्रान्स, इत्यादि देशांकडून मागविण्यांत येणारी साखर बंद करण्यांत येईल. फॉर्मोसा व ऑस्ट्रेलिआकडील आयात मात्र पूर्वीप्रमाणेंच चालू राहील.

---

## परदेशीय प्रवाश्यांना सोयीचीं तिकिटें

भारतामधील रेल्वेनीं परदेशीय प्रवाश्यांची सोय करण्यासाठी खास सवलतीचीं तिकिटें काढलीं आहेत. ह्या तिकिटांसाठी प्रवाश्यांना रु. ५६० द्यावे लागतील आणि तीं ३० दिवसपर्यंत चालतील. तिकिटांचा उपयोग करून प्रवाश्यांना मन मानेल तसा प्रवास करतां येईल. परदेशीय प्रवाश्यांना कमी आकारांत व अधिक सुखकर प्रवास करतां यावा म्हणून तीं काढण्यांत आलीं आहेत. ज्या गाड्यांना सुखद हवा राखणारे डबे असतील त्यांमधून परदेशीय प्रवाश्यांना प्रवास करतां येईल. ज्या गाड्यांना असे डबे नसतील त्या गाड्यांतून त्यांना पहिल्या वर्गानें प्रवास करतां येईल. अशा प्रकारचीं खास तिकिटें सध्यां दोन वर्षेंच देण्यांत येणार आहेत.

---

## आयुर्विम्याचा धंदा वाढविण्याचा उपाय

एखाद्या पुरुषाला आयुर्विमा उतरण्यास लावण्यासाठी काय करावें असा प्रश्न विमाप्रचारकांना नेहमींच पडतो. त्याचें उत्तर आयुर्विमा कॉर्पोरेशनचे माजी अध्यक्ष श्री. गोपालकृष्णन् ह्यांनीं दिलें आहे. मुंबई येथें जाहिरात देणाऱ्या संस्थांच्या क्लबांत बोलतांना ते म्हणाले कीं, पुरुषाला त्याच्यावर असणाऱ्या कौटुंबिक जबाबदारीची जाणीव स्त्रियांतर्फे करून देणें अधिक सोपें असतें. श्री. गोपालकृष्णन् ह्यांना ह्या उपायाची इतकी खात्री वाटली कीं, कांहीं वर्षांपूर्वी त्यांनीं कलकत्त्यांत आयुर्विम्याचा प्रचार करणाऱ्या स्त्रियांच्या पथकाची योजना केली. ह्या पथकानें चांगली कामगिरी केल्याचें आढळून आलें. आतां हा उपाय मुंबईंत योजण्यांत आला असून देशांत इतरत्रहि तो अवलंबिला जाण्याची शक्यता आहे.

### ओरिसा राज्यांतील दारूबंदी

ओरिसा राज्यांतील ८ जिल्ह्यांपैकीं पांच जिल्ह्यांत दारूबंदी चालू आहे. दारूबंदीची व्याप्ति वाढविण्याच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी राज्य सरकारनें एक चौकशी समिति नेमली होती. समितीनें अशी शिफारस केली आहे कीं, दारूबंदीची व्याप्ति वाढविल्यामुळें उत्पन्नांत जी घट होईल ती भरून काढण्याचें आश्वासन मध्यवर्ती सरकारनें दिलें तरच उरलेल्या जिल्ह्यांत दारूबंदी करण्यांत यावी. राज्यसरकारनें ही शिफारस मान्य केली आहे.

### विमानाची कसरत करणारा नट ठार

चित्रपटांत विमान-अपघातांचीं दृश्यें दाखविण्यासाठी खोटे विमान-अपघात करण्यांत पटाईत असलेला केन टायलर ऱ्हा हॉलिवुडमधील नट विमान-अपघातांत मरण पावला. त्यानें निरनिराळ्या चित्रपटांत १४४ अपघात करून दाखविले होते. कमी उंचीवर विमानाची कसरत करण्याचा एक चित्रपट घेतला जात असतां त्याचें विमान एकदम खालीं पडलें.

### कावेरीच्या खोऱ्यांतील तेलाचा शोध

कावेरीच्या खोऱ्यांत भूमिगत तेलाचा शोध करण्याचें काम जवळजवळ पूर्ण झालें आहे, अशी माहिती लोकसभेत सांगण्यांत आली. तेलाच्या पाहणीसाठी आवश्यक असणारा भूगर्भविषयक नकाशा तयार झाला आहे. त्याशिवाय इतर आधुनिक उपकरणांच्या साह्यानें पाहणी करण्याचें कामहि संपत आलें आहे. तथापि तेलाच्या शोधाविषयीं अद्याप निश्चितपणें कांहीं सांगतां येण्यासारखें नाहीं.

### राष्ट्रीय निशाणांची खरेदी

केरळ राज्य सरकारनें असा निर्णय घेतला आहे कीं, राज्याला लागणारीं सर्व राष्ट्रीय निशाणें मुंबईमधील खादी व ग्रामोद्योग भांडाराकडून घेण्यांत यावीं. इतर ठिकाणांहून निशाणें कमी किंमतींत मिळत असली तरीहि तीं घेऊं नयेत असें ठरविण्यांत आलें आहे. भारत सरकारनें विनंती केल्यावरून हा निर्णय घेण्यांत आला आहे.

### प्रा. हाल्डेन ह्यांना संशोधनासाठी सवलती

भारतांत स्थायिक होऊन भारताचे नागरिक झालेले ब्रिटिश शास्त्रज्ञ प्रा. हॉल्डेन आणि ओरिसाचें सरकार ह्यांच्यांत एक करार झाला आहे. करारांतील अटीप्रमाणें प्राध्यापकांनीं जीवशास्त्रविषयक संशोधन करावयाचें असून त्याबद्दल त्यांना पगार व इतर खर्च देण्यांत यावयाचा आहे. राज्य सरकारच्या जादा अंदाजपत्रकांत ह्यासंबंधीं ५६,००० रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. गेल्या महिन्यांत प्रा. हाल्डेन कलकत्त्याहून भुवनेश्वर येथें राहण्यास गेले.

### धूम्रपान सोडण्यासाठी सल्ला देणारीं केंद्रें

झेकोस्लोव्हाकिआंत धूम्रपान करणाऱ्या लोकांची संख्या युरोपमधील इतर कोणत्याहि देशापेक्षा अधिक आहे. ह्या बाबतींत त्याचा अनुक्रम जगांत तिसरा लागतो. अमेरिका व कॅनडा ह्या देशांत मात्र झेकोस्लोव्हाकिआपेक्षाहि अधिक लोक धूम्रपान करतात. धूम्रपान कसें सोडावें ह्याविषयीं सल्ला देणारीं ११ केंद्रें झेकोस्लोव्हाकिआंत खोलण्यांत आलीं आहेत. जे लोक एकसारखे धूम्रपान करीत असतील त्यांना वैद्यकीय मदत देण्याची व्यवस्था केंद्रांत केली आहे. त्याशिवाय धूम्रपानामुळें आरोग्याची हानि कशी होते ह्यासंबंधीं माहिती देणारीं व्याख्यानेंहि केंद्रातर्फे देण्यांत येणार आहेत.

### पोलंडकडून १४ कोटी रुपयांची मदत

पोलंडनें भारताला १४ कोटी रुपयांचें कर्ज देण्याचें ठरविलें आहे. ह्या मदतीचा उपयोग करून भारत सरकार आणखी उद्योगधंदे काढणार आहे. भारी यंत्रसामग्रीचे नवे कारखाने काढण्याचा सरकारचा विचार आहे कोणत्या प्रकारचे कारखाने काढावयाचे ह्याबद्दल उभयतां सरकारांत वाटाघाटी चालू आहेत. कोळशाच्या खाणींत वापरण्याची यंत्रसामग्री तयार करण्याचा एक कारखाना काढण्यांत येण्याचा संभव आहे. पोलंडचें तांत्रिक साह्य घेऊन कोळसा-खाणींच्या विभागांत कोळशाच्या सात खोल खाणी चालू करण्यांत येणार आहेत.

**Bankers Practical Training Course**

**SIXTH BATCH**

Admission to Bank-employees and persons desirous to enter into Bank Service.

**Duration — 3 months. Date of Commencement — 5th September 1962.**

Enquire at :— **The Deccan Institute of Commerce**
717 Budhwar Peth, Poona 2.

Tel. No. 22360.


**दातांच्या स्वच्छतेसाठी**

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## श्री. रघुनाथराव पाटील

### चेअरमन, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

भारताच्या निरनिराळ्या भागांत सहकारी चळवळीचा प्रसार वाढत असून, तिची यशस्विता त्यांत काम करणाऱ्या व्यक्तींच्या सद्गुणांवर आणि त्यांतील व्यावहारिक पथ्यांवर अवलंबून असते. अशा निवडक व्यक्तींचा उल्लेख करून, त्यांच्या सद्गुणांचा गौरव करणें अगत्याचें आहे, असें आम्हांला वाटतें; व म्हणून आजच्या या लेखांत श्री. रघुनाथराव पाटील, चेअरमन, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, यांचा अल्प परिचय आम्ही देत आहोंत.



सातारा जिल्ह्यांतील कराड तालुक्यांत २।३ हजार लोकवस्तीचें तें खेडेगांव. त्या गांवाचें नांव चोरें. श्री. रघुनाथराव पाटील या गांवचे मूळ रहिवासी. या गांवाच्या नांवावरून जरी सामाजिक दुर्गुणांचा क्षणिक भास झाला, तरी श्री. रघुनाथराव पाटलांनीं केवळ हा आभास आहे, असें गुणांनीं सिद्ध केल्याचें दिसतें.

या त्यांच्या स्वतःच्या गांवीं प्राथमिक शिक्षणाची पुरेशी सोय नव्हती. म्हणून पहिल्या चार इयत्तांचें शिक्षण झाल्यावर, त्यांना शेजारच्या तीन मैलांवर असलेल्या इंदोली गांवीं शाळेला जावें लागे. त्यानंतर मराठी शिक्षण पुरें करण्यासाठीं त्यांना सुपने, ता. कराड येथें जावें लागलें. हें प्राथमिक शिक्षण घेण्यासाठींहि त्यांना बऱ्याच वेळां शारीरिक परिश्रम घ्यावे लागले, तशा अनेक धडपडी कराव्या लागल्या. त्यांच्या या पूर्वार्धांतहि त्यांना पारिश्रमिक जीवनाचा अल्पानुभव आल्यामुळें स्वाभाविकच त्यांचें शरीर व मन निर्भय बनलें. कष्टांची तमा न करतां, पुढील शिक्षणास सुरुवात करावी, अशी त्यांना उमेद वाटूं लागली. परंतु निर्बल पंखांनीं आभाळांत कसें उडावें, अशी त्यांची स्थिति झाली. कारण त्यांच्या बाल्यावस्थेंत त्यांचे पिताजी निवर्तले. घरीं कर्त्यासवरत्या त्यांच्या मातोश्री होत्या. घरची आर्थिक बाजू लंगडीच होती. अशा परिस्थितींत परक्या ठिकाणीं जाऊन दुय्यम शिक्षण घेणें त्यांच्या कक्षेबाहेरील गोष्ट होती. तरीपण त्यांतूनहि मार्ग काढण्याची त्यांची तळमळ चालू होती. सुदैवानें श्री. रघुनाथराव पाटलांना त्यांचे मावसबंधु श्री. बाळासाहेब देसाई ( सध्यांचे महाराष्ट्र राज्याचे शेतकी मंत्री ) यांचें बहुमोल साहाय्य मिळालें. त्यांनीं कोल्हापूर येथील श्रीक्षात्रजगद्गुरु वैदिक विद्यालयांत प्रवेश मिळविला व पुढें धार्मिक वैदिक विधि-कार्य करून त्यांनीं मॅट्रिकपर्यंतचा अभ्यासक्रम पुरा केला.

परिश्रमाचा घाम आणि दुःखाचे अश्रु यांना कष्टी-दुःखी जीवनाबद्दल सहानुभूति वाटणें स्वाभाविक आहे. ज्यांनीं आपल्या दुय्यम शिक्षणाचा टप्पा कष्टानें पुरा केला, त्या रघुनाथरावांना असें वाटूं लागलें कीं, आपल्या भविष्यजीवनांत समाजांतील दुःख-कष्ट कमी करण्यांत कांहीं हातभार लावतां आल्यास पाहावें; या विचाराबरोबरच पुढील शिक्षणाचें ध्येयहि त्यांच्यासमोर होतें. त्यांनीं आपल्या अनेक आप्तेष्टांकडून तथा कोल्हापुरांतील कांहीं श्रीमंत मंडळींकडून वेळोवेळीं साहाय्य मिळविलें. महाविद्यालयांत प्रवेश मिळविला; आणि १९४१ सालीं वकिलीची परीक्षा दिली.

नंतर त्यांनीं कराडला वकिली सुरू केली. वकिलीचा धंदा करीत असतांनाच त्यांनीं सहकारी कार्यक्षेत्रांत प्रवेश केला. या क्षेत्रांत त्यांचें मन रमलें. कार्याबद्दल निष्ठा निर्माण झाली. या सहकारी प्रयोगांत सामान्य माणसाचें जीवन विकसित होईल, अशी त्यांना आशा वाटूं लागली.

१९४६ सालांत कराड व पाटण तालुका को-ऑप. सुपरवायझिंग युनियनच्या चेअरमनपदीं त्यांची निवड झाली. नंतर १९४७–१९४८ व १९४८–४९ सालांत कराड तालुका सहकारी ख. वि. संघाचे चेअरमन म्हणून त्यांनीं काम केलें. या जिल्ह्यांत जिल्हा सहकारी बँक नव्हती. ती स्थापन व्हावी म्हणून माननीय यशवंतरावजी चव्हाण, बाळासाहेब देसाई, आदि मंडळींनीं प्रयत्न केले त्यांत श्री. रघुनाथराव पाटलांनींहि भाग घेतला. १९४९ मध्यें जिल्हा सहकारी बँकेची स्थापना झाली व १९५१ पर्यंत श्री. बाळासाहेब देसाई यांनीं त्या बँकेचे चेअरमन म्हणून काम केलें. १९५१ मध्यें श्री. देसाई यांनीं सार्वत्रिक निवडणुकीनंतर बँकेच्या चेअरमनपदाचा राजीनामा दिला; व त्या जागीं श्री. रघुनाथराव पाटलांची निवड झाली. गेलीं अकरा वर्षें ते त्या बँकेचे चेअरमन म्हणून काम पाहात आहेत. त्या बँकेचें खेळतें भांडवल सध्यां ३। कोटींच्या आसपास आहे. त्यांनीं जिल्हा बँकेला केलेलें मार्गदर्शन कौतुकास्पद आहे. जिल्ह्यांतील गरजू शेतकऱ्यांना आर्थिक कर्जपुरवठा पुरेसा व्हावा, असा त्यांचा कटाक्ष असतो; तसेंच आर्थिक कर्जपुरवठ्यानें शेतकऱ्यांना दुय्यम धंदे करतां आल्यास अधिक चांगलें होईल, या कल्पनेनें त्यांनीं अलीकडेच दूध-व्यवसायाकरितां म्हैशींच्या खरेदीसाठी शेतकऱ्यांना कर्ज देणें, तसेंच कोंबड्यापालन धंद्यासाठी कर्ज देणें, इ. नवीन कर्जव्यवहार बँकेतर्फे सुरू करण्यांत आले आहेत. सहकारी बँकिंगचा त्यांचा दीर्घानुभव समाजाला तसेंच सहकारी चळवळीला निश्चितपणें पोषक ठरेल, असें आम्हांला वाटतें.

याशिवाय सहकारी क्षेत्रांत अनेक संस्थांशीं त्यांचा निगडित संबंध आहे. सातारा जिल्हा सह. बोर्डाचे गेलीं ९।१० वर्षें ते चेअरमन होते. तसेंच पश्चिम महाराष्ट्र सह. बोर्डाचे माननीय चिटणीस म्हणून त्यांनीं काम केलें आहे. महाराष्ट्र राज्य सह. बँकेच्या संचालक मंडळावर गेलीं ५।६ वर्षें सदस्य म्हणून काम करतात. महाराष्ट्र राज्य सह. खरेदी-विक्री सोसायटीचे ते व्हा. चेअरमन आहेत. १९५९ मध्यें कराड येथें त्यांनीं कराड तालुका दूधपुरवठा संघ स्थापन केला आहे. त्या संघामार्फत कराड व कोयनानगर येथें दुधाचा पुरवठा केला जातो. दररोज ६०० लिटर्स दुधाचें वांटप होतें. सीलबंद बाटल्यांतून दूधपुरवठा करण्याची योजना अलीकडेच त्यांनीं सुरू केली आहे. या दूध-पुरवठा योजनेला पूरक अशा १५।१६ दूध-उत्पादक सोसायट्या कराड तालुक्यांत सुरू केल्या आहेत.

याशिवाय जिल्ह्यांतील सहकारी संस्थांना वेळोवेळीं सल्ला देणें, मार्गदर्शन करणें इ. कामें सतत चालू असतात. या सहकारी चळवळींतील कार्यव्यापामुळें त्यांच्या वकिली व्यवसायाकडे दुर्लक्ष होणें स्वाभाविक आहे. वकिली व्यवसायांत प्रवेश केलेल्या एका होतकरू वकिलानें तिकडे दुर्लक्ष करून, स्वतःला सहकारी चळवळींत वाहून घेणें ही बाब गौरवास्पद आहे, यांत शंका नाहीं.

याशिवाय श्री. रघुनाथराव पाटील काँग्रेसचे क्रियाशील सभासद आहेत. सातारा जिल्हा काँग्रेस कमिटींत त्यांनीं सतत तीन वर्षें चिटणीस म्हणून काम केलें.

### केरळ राज्यांत निघणारा औषधाचा कारखाना

केरळ राज्यांत रशिआच्या सहकार्यानें औषधाचा कारखाना उभारण्यांत येणार आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी ११ कोटी रुपये खर्च येणार आहे. कॅफीन तयार करण्यासाठी जी प्रक्रिया रशिअन तंत्रज्ञांनीं प्रथम सुचविली होती, ती परवडण्यासारखी नाहीं असें आढळून आल्यामुळें कारखान्याच्या उभारणीचें काम लांबलें होतें. कॅफीन उत्पादन करण्यासाठी ७५ टक्के चहाच्या पानाचे देंठ आणि २५ टक्के वायां जाणारीं चहाचीं पानें ह्यांचा उपयोग करावा असें सुचविण्यांत आलें होतें. परंतु ह्या प्रक्रियेनें उत्पन्न करण्यांत येणाऱ्या कॅफीनच्या प्रत्येक टनामागें १ लाख रुपये उत्पादनाचा खर्च येईल, असें दिसून आलें. ह्याउलट कलकत्त्यामधील एका कंपनीनें तयार केलेलें कॅफीन दर टनाला ५०,००० रुपये ह्या भावानें मिळूं शकतें आणि आयात केलेलें कॅफीन तर दर टनाला १८,००० रुपये ह्या भावानें मिळूं शकतें. रशिअन तंत्रज्ञांनीं कॅफीनच्या उत्पादनासाठी आतां नवीन पद्धत सुचविली आहे. नव्या पद्धतीसाठी जरूर असणारी यंत्रसामग्री रशिआंत तयार करण्यांत येणार आहे. मात्र त्यासाठी कांहीं अवधि लागेल. तथापि, जोराचे प्रयत्न केल्यास हा कारखाना तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत चालूं होईल अशी अपेक्षा आहे. कॅफीनच्या उत्पादनाच्या पहिल्या पद्धतीची चर्चा करण्यासाठी भारताचें एक प्रतिनिधि-मंडळ मॉस्कोला गेलें होतें. त्यांनीं रशिअन तज्ज्ञांशीं चर्चा करून चहाच्या कारखान्यांत वायां जाणाऱ्या पानांपासून कॅफीन तयार करण्याची पद्धत शोधून काढली. त्यामुळें कॅफीनच्या उत्पादनाचा खर्च दर टनामागें ३०,००० रुपयेच येईल असा अंदाज आहे.

---

### कोळसा-धुलाईचा कारखाना; पोलंडची मदत

नॅशनल् कोल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशननें पोलंडशीं एक करार करून कोळसा-धुलईचा कारखाना उभारण्याचें ठरविलें आहे. बिहारमधील करणपुरा कोळसा खाणीच्या विभागांत गिडी येथें हा कारखाना उभारण्यांत यावयाचा आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी ८·३१ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. बिहारमध्यें कॉर्पोरेशननें काढलेला कोळसा-धुलाईचा हा दुसरा कारखाना होईल. ह्या कारखान्यांतून दरसाल सुमारें २८लाख टन कोळसा उत्पादन करण्यांत येईल. १९६५च्या एप्रिल महिन्याच्या आसपास कारखान्यांत उत्पादन सुरू होईल. निरनिराळ्या कामासाठी वापरण्यांत यावयाच्या कोळशाच्या उत्पादनाला प्रारंभ झाल्यावर रेल्वेच्या एंजिनला लागणाऱ्या आकाराचा १० लाख टन कोळसा उपलब्ध होऊं शकेल. त्याशिवाय उष्णतेवर वीज उत्पन्न करणाऱ्या केंद्राला लागणारा ५ लाख टन कोळसा कारखान्यांतून उत्पादन करण्यांत येईल. ह्या प्रकारचा कोळसा निर्माण करण्यासाठी लागणारा प्राथमिक अवस्थेंतील कोळसा कॉर्पोरेशनच्या मालकीच्या खाणींमधूनच पुरविण्यांत येणार असून त्यापैकीं कांहीं कोळशाची वाहतूक अर्धांतरीं बांधलेल्या दोराच्या पुलाच्या साह्यानें करण्यांत येणार आहे. १९६० च्या मे महिन्यांत भारत आणि पोलंड ह्यांच्या दरम्यान आर्थिक सहकार्याचा करार झालेला होता. त्याला अनुसरूनच कारखाना उभारण्याचा नवा करार करण्यांत आला आहे. आर्थिक सहकार्याच्या पहिल्या कराराप्रमाणें पोलंडकडून भारताला १४·३ कोटी रुपयांचें कर्ज मिळणार आहे. ह्या कर्जाचा उपयोग कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामग्री मिळविण्यासाठी करण्यांत यावयाचा आहे. यंत्रसामग्रीपैकीं शक्य ती यंत्रसामग्री भारतांतच मिळविण्यांत येईल. कारखाना उभारण्याच्या कामीं पोलंडचें सहकार्य मिळणार आहे.

### रहदारीला अडथळा आणणारे बैल पकडले

कलकत्ता शहरांत २०० बैल रस्त्यांत इतस्ततः हिंडून रहदारीला अडथळा आणीत होते. ह्या बैलांना पकडून दूर पाठविण्याची मोहीम कलकत्त्याच्या पोलिसांनीं हातीं घेतली आहे. ह्या कामीं पोलीस कमिशनर जातीनें लक्ष घालीत आहेत. २०० बैलांपैकीं २९ बैल पकडून पोलिसांनीं बिहारमधील हजारीबाग येथील एका पशुविषयक संस्थेंत पाठविले. बैल पकडण्याचें काम रात्रीं करण्यांत येते. कारण ही कामगिरी पाहण्यासाठी दिवसाच्या वेळीं शेंकडों लोक जमत असतात. बैलांना पकडण्याचें काम अवघड जाईल असा पोलिसांचा कयास होता; पण तो चुकीचा ठरला.


---

### मद्रासच्या राजभवनांत सर्पसत्र

मद्रासच्या राजभवनांत सापांचा सुळसुळाट झाल्यानें मोठी कठीण परिस्थिति निर्माण झाली आहे. गव्हर्नरांचें निवासस्थान त्यामुळें धोक्याचें झालें आहे. नाग व साप ह्यांना पकडणारा एक गारुडी त्यांचा नायनाट करण्यासाठी मुद्दाम नेमण्यांत आला आहे. तो दरमहा सुमारें ५० सर्प पकडून ठार मारतो; परंतु तरीहि सर्पांची संख्या कमी होत नाहीं. प्रत्येक विषारी सर्पामागें गारुड्याला ५० नये पैसे देण्यांत येतात; आणि नागामागें एक रुपया देण्यांत येतो. राजभवनाच्या सभोंवार २०० एकर खुली जागा आहे. ह्या जागेंत सुमारें २,००० हरणें वावरत असतात. हरणांची संख्या वाढल्यामुळें त्यांना आतां गवत कमी पडूं लागलें आहे. हरणांना भरपूर गवत मिळावें म्हणून उपाययोजना करण्यांत येत आहे.

---


बँकेचे फायदे गीत



साद आणि प्रतिसाद

जनतेच्या सोयीखातर, हातीं घेतलेल्या अनेक विकासकार्यांचा खर्च भागण्याकरि वेळोवेळीं सरकारतर्फे सादर करण्यांत येणारे कर्जरोखे खरिदण्यांत बँका नेहमीं पुढ घेतात. या करितां बँकांना आपल्या ठेवींची जरुरी आहे. आपल्याकडून आलेल्या अधि ठेवींमुळें

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड

अशा तऱ्हेची मदत करण्यांत नेहमींच अग्रभागी राहूं शकेल.

रजिस्टर्ड ऑफिस : ११७७, बुधवार पेठ, पुणें-२. तार : MAHABANK

महाराष्ट्रांत व इतरत्र सर्वत्र बँकेच्या शाखा आहेत.

alco M

### द्राक्षापासून दारू तयार करण्याचा कारखाना

बंगलोर शहराच्या आसपास अलीकडे द्राक्षाची लागवड मोठ्या प्रमाणावर करण्यांत येऊं लागली आहे. त्याचा फायदा घेऊन दारू तयार करण्याचा एक कारखाना काढण्याचा विचार म्हैसूरचे सरकार करीत आहे. कारखान्यामुळें द्राक्षाच्या लागवडीला स्थिरता येईल अशी सरकारची अपेक्षा आहे. कारखाना सहकारी पद्धतीचा काढावा कीं खाजगी मालकीचा असावा, ह्याविषयीं अद्याप निर्णय घेण्यांत आलेला नाहीं. गेल्या कांहीं वर्षांत बंगलोर शहराच्या परिसरांत द्राक्षांची लागवड वाढत चाललेली आहे. सध्यां ५ ते ६ हजार एकर जमिनींत द्राक्षांच्या मळ्यांची जोपासना करण्यांत येत असते. ह्या भागांत दरसाल सुमारें ३ कोटी रुपयांचीं द्राक्षें करण्यांत येत असावींत. म्हैसूर राज्यांत द्राक्षांची लागवड बऱ्याच ठिकाणीं करण्यांत येते. द्राक्षाची बागाईत ही किफायतशीर ठरलेली आहे. परंतु ह्या धंद्यावर द्राक्षाच्या किंमतीच्या चढउतरांचा बराच परिणाम होत असतो. बाजारांत द्राक्षें मुबलक झालीं कीं त्यांचा भाव साहजिकच उतरतो. बाजाराच्या लहरींपासून सुटण्यासाठीं द्राक्षापासून दारू तयार करण्याचा उपाय सुचविण्यांत येत आहे. द्राक्षाची एक विशिष्ट प्रकारची जात सर्व वर्षभर फळ देऊं शकते, आणि हवामानांतील फरकाला तोंडहि चांगली देते. ह्या जातीची लागवड करणाऱ्या बागाईतदारांनीं द्राक्षाच्या रसावर संस्करण करण्यासाठीं आणि त्याची विक्री करण्यासाठीं एक सहकारी संघटना स्थापन केली आहे. संघटनेमार्फत तयार करण्यांत येणारी दारू अतिपूर्वेकडील देश आणि सीलोन ह्या भागांत निर्यात करण्यांत येणार आहे. म्हैसूर सरकारनें द्राक्षाच्या लागवडीस उत्तेजन देण्याचें ठरविलें असून नव्या नव्या जातीच्या द्राक्षांची लागवड करण्याचे प्रयत्न चालू केले आहेत.

### भिलई येथील पोलाद कारखान्याचा विस्तार

मध्यप्रदेशांत भिलई येथें स्थापन करण्यांत आलेल्या पोलादाच्या कारखान्याचा विस्तार करण्यासंबंधीं भारत आणि रशिया ह्यांच्या दरम्यान गेल्या फेब्रुवारी महिन्यांत करार करण्यांत आला आहे. ह्या कराराप्रमाणें करावयाचें काम सुरू करण्याची सिद्धता आतां झाली आहे. करारांत ठरविल्याप्रमाणें कारखान्याची सध्यांची उत्पादनक्षमता सालीना १० लाख टनांची आहे. ती २५ लाख टनांपर्यंत वाढविण्यांत येणार आहे. १९६५ अखेर विस्तारयोजनेप्रमाणें ठरविण्यांत आलेले कारखान्याचे सर्व विभाग उत्पादन करूं लागतील. योजनेप्रमाणें दोन नव्या झोतभट्ट्या उभारण्यांत येणार आहेत. त्यांची उत्पादनक्षमता सध्यांच्या भट्ट्यांच्या मानानें बरीच अधिक आहे. भट्ट्यांतून पोलादाच्या उत्पादनाला प्रारंभ झाला म्हणजे भारतामधील ओतकाम करणाऱ्या कारखान्यांना लागणारें पोलाद तयार मालांतून पुरवतां येईल. भट्ट्या उभारण्याचें काम तीन टप्प्यांत पुरें करण्यांत येणार आहे. कुशल कामगारांची उणीव भासत असल्यामुळें त्या उभारण्याच्या कामीं थोडा विलंब लागण्याची शक्यता आहे. कारखान्यांतील सध्यांच्या उत्पादन विभागांनीं आपल्या उत्पादनक्षमतेपैकीं ९५ टक्के उत्पादनक्षमतेचा उपयोग करून घेतलेला आहे. कांहीं महिन्यांपूर्वी भिलई येथील कारखान्यांत तयार झालेला माल वाहतुकींतील अडथळ्यामुळें तेथेंच पडून राहात असे. परंतु आतां तयार झालेला माल योग्य मुदतींत वाहून नेण्याची व्यवस्था अधिक कार्यक्षम झाली आहे. वाहतुकीची व्यवस्था नीट नसल्यामुळें कारखान्यापुढें अडचणीची परिस्थिति निर्माण होई, आणि कांहीं विभागांतील उत्पादन तात्पुरतें बंद ठेवावें लागे. त्यामुळें कारखान्याच्या इतर विभागांवरहि परिणाम होई.

### सालरजंग वस्तुसंग्रहालयासाठीं इमारत

हैदराबाद येथील नबाब सालरजंग वस्तुसंग्रहालयासाठीं बांधण्यांत यावयाच्या इमारतीच्या प्राथमिक कामास प्रारंभ करण्यांत आला आहे. इमारतीसाठीं १ कोटी रुपये खर्च येणार असून तो मध्यवर्ती सरकार व नबाब सालरजंग ह्यांचे वारस मिळून करणार आहेत. सध्यां हें वस्तुसंग्रहालय शहराच्या मध्यवस्तीच्या गजबजाटांत आहे. लोकसभेनें कायदा करून वस्तुसंग्रहालय राष्ट्रीय महत्त्वाचें म्हणून जाहीर केलें आहे. इमारतीसाठीं ११ एकर जमिनीची निवड करण्यांत आली आहे. हें वस्तुसंग्रहालय जगप्रसिद्ध असून त्यांत इतिहासकालीन दप्तर व दुर्मिळ प्राचीन वस्तु ह्यांचा फार मोठा सांठा आहे. हैद्राबाद शहरांतील प्रेक्षणीय स्थळांत त्याची प्रामुख्यानें गणना करण्यांत येते.

### कुंदा वीजनिर्मितीचें धरण

मद्रास राज्यांत बांधण्यांत येत असलेल्या कुंदा वीजनिर्मितीच्या धरणासाठीं सुमारें ६० कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. १९६४ च्या मध्याच्या सुमारास त्याचें बांधकाम पुरें होण्याची शक्यता आहे. मद्रास राज्यांतील हें ६ वें जलविद्युत् केंद्र असून त्यासाठीं कोलंबो मदत योजनेप्रमाणें कॅनडाच्या सरकारकडून २३ कोटी रुपयांची रकम मिळालेली आहे. विद्युतनिर्मितीसाठीं एकूण पांच वीज-केंद्रें बांधण्यांत येणार आहेत. त्यांपैकीं पहिलीं दोन दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत बांधून पुरीं करण्यांत आलीं. दोन्ही केंद्रांत मिळून १,८०,००० किलोवॅट विजेचें उत्पादन होऊ शकेल. उरलेलीं तीन केंद्रें चालू करण्यांत आलीं म्हणजे कुंदा योजनेंत ठरल्याप्रमाणें ४,३०,००० किलोवॅट वीज निर्माण होईल.


## दि बेळगांव बँक लि.

**रजिस्टर्ड व मुख्य कचेरी : बेळगांव**

स्थापना : १९३० शेड्यूल्ड बँक

**ह्या बँकेच्या व्यवहारांत सतत वाढ होत आहे. सुरक्षितता, निश्चिति आणि सेवा ह्यांची ती निदर्शक आहे; त्यासाठी तिची सर्वत्र ख्याति आहे.**

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. | ८,०८,००० |
| एकूण गंगाजळी | ... | रु. | ५,५०,००० |
| ठेवी | ... | रु. | १,०४,००,००० |
| एकूण जिंदगी | ... | रु. | १,१७,००,०००वर |

**म्हैसूर आणि महाराष्ट्र राज्यांत मिळून २८ शाखांचा विस्तार**

आपल्या बँकिंगविषयक कोणत्याहि कामासाठी आमच्या कोणत्याहि कचेरीस भेट द्या; प्रत्येक कामाकडे तत्परतेनें लक्ष दिलें जाईल.

## पश्चिम बंगालमध्यें किंमती कडाडल्या

पश्चिम बंगालमध्यें जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती कडाडल्या आहेत. त्यामुळें शहरांमधील कमी गटाच्या उत्पन्नाचे कामगार आणि ग्रामीण भागांतील गरीब शेतकरी ह्यांना फार झळ पोंचत आहे. ह्यापूर्वी रोजच्या गरजेच्या वस्तूंच्या किंमती इतक्या चढल्याचें उदाहरण नाहीं. कित्येक कुटुंबांच्या रोजच्या आहारांतून मासे, मांस आणि अंडीं नाहींशीं झालेलीं आहेत. त्याऐवजीं भाजी, डाळी आणि इतर पदार्थांचा उपयोग वाढत्या प्रमाणावर करण्यांत येऊं लागला आहे. पण ह्या पदार्थांचा तुटवडाहि वाढत चालल्यामुळें आहारांतच कपात करण्याचा प्रसंग येऊं लागला आहे. खाद्य वस्तूंच्या, सरकारमार्फत सांगण्यांत येणाऱ्या किंमती आणि प्रत्यक्ष बाजारांत द्याव्या लागणाऱ्या किंमती ह्याच्यांत खूपच तफावत दिसून येत आहे. गेल्या महिन्याच्या तुलनेनें माशांच्या किंमती ४३ टक्क्यांनीं वाढल्या असून, डाळी, तांदूळ, वनस्पति तेल व भाजीपाला ह्यांच्या किंमती ६ ते ८ टक्क्यांनीं वाढल्या आहेत. सरकारी अधिकाऱ्यांच्या मतानें खाद्यपदार्थांच्या तुटवड्यामुळें किंमती चढल्या नसून दलालांच्या कारवाईमुळें त्या चढल्या आहेत. सरकार ह्या पदार्थांचीं दुकानें स्वत:च काढण्याचा विचार करीत आहे. त्याचबरोबर नफेबाजां-विरुद्ध कायदेशीर उपाय योजण्याचेंहि घाटत आहे.

## भारतांतील दहा मोठे कारखाने

| | |
|---|---|
| १. हिंदुस्थान स्टील कं. | लोखंड व पोलाद |
| २. टाटा आयर्न स्टील कं. | ,, |
| ३. इंडियन आयर्न अँड स्टील कं. | ,, |
| ४. सिंधिया स्टीम नॅव्हिगेशन कं. | शिपिंग |
| ५. असोसिएटेड सिमेंट कं. | सिमेंट |
| ६. नॅशनल कोल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन | कोळसा व खाणकाम |
| ७. बर्मा शेल रिफायनरीज | पेट्रोलियम पदार्थ |
| ८. सिंद्री फर्टिलायझर्स अँड केमिकल्स* | रसायनें व खतें |
| ९. हिंदुस्थान एअर क्राफ्ट | विमानें |
| १०. टाटा इंजिनिअरिंग अँड लोकोमोटिव्ह | इंजिनिअरिंग व इंजिनें |

## कामगारांना एंजिनिअरिंगचें शिक्षण

कामगारांना एंजिनिअरिंगचें शिक्षण घेतां यावें म्हणून मध्य-प्रदेश सरकारनें एंजिनिअरिंग डिप्लोमाच्या अभ्यासक्रमाचें शिक्षण देणाऱ्या दोन संस्था काढण्याचें ठरविलें आहे. त्यांपैकी एक भोपाळ येथें व दुसरी जबलपूर येथें काढण्यांत येईल. अभ्यास-क्रम पांच वर्षांचा ठेवण्यांत आला आहे. माध्यमिक शाळांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कोठल्याहि कामगाराला संस्थेंत प्रवेश मिळूं शकेल. संस्थांचे अभ्यासवर्ग संध्याकाळीं चालविण्यांत येतील. सध्यां १२० विद्यार्थी शिकविण्याची सोय करण्यांत आली आहे.

**रस्त्यावरील अपघाताचे बळी**—१९६० सालीं युरोप-मधील रस्त्यावर झालेल्या अपघातांत ५१,१४५ लोक दगावले आणि १७,०३,५७२ लोक जखमी झाले. हे आंकडे १७ देशां-तील अपघाताचे आहेत. जर्मनीमधील रस्त्यांवर होणाऱ्या अप-घातांची संख्या सर्वांत अधिक आहे. सगळ्यांत कमी अपघात ब्रिटनमधील रस्त्यावर होतात, असें आढळून आलें आहे.

* आतां फर्टिलायझर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया.


# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेडयूल्ड बँक

**हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.**

टेलिफोन नं ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ता:–युवर्बँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू :–०·५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक :–३ टक्के

मुद्दत ठेवी

१ वर्ष–४ टक्के, २ वर्षे–४·२५ टक्के, ३ वर्षे–४·५० टक्के, ४ वर्षे–४·७५ टक्के, ५ वर्षे–५ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युमिलेटिव्ह ठेवीचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा विस्तार

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर–मार्केट यार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| गंगाजळी | रु. | ५००,००० |
| ठेवी | रु. | तीन कोटी |
| खेळतें भांडवल | रु. | सव्वातीन कोटीहून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जनरल मॅनेजर.

रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. चेअरमन.

टेलिफोन नं. २२४८३.

# पुणें सेंट्रल
## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड,

लक्ष्मी पथ, पुणें शहर.

**इकडे वेळींच लक्ष द्या..........**

**आकर्षक व्याजाच्या दरानें आपला पैसा सहकारी बँकेंत गुंतवून निश्चिंत राहा.**

दिनांक १ एप्रिल, १९६१ पासून आमचे बँकेनें कायम व सेव्हिंग्ज ठेवीवरील व्याजाचे दरांत वाढ केली आहे.

| कायम ठेव | | | व्याजाचे नवीन दर |
|---|---|---|---|
| १ वर्ष | ... | ... | ४ टक्के |
| २ वर्षें | ... | ... | ४। टक्के |
| ३ वर्षें | ... | ... | ४॥ टक्के |
| सेव्हिंग्ज ठेव | ... | ... | १॥ टक्के |

या खेरीज शॉर्ट टर्म व कॉल डिपॉझिट्सवरील व्याजाचे दराबाबत चौकशी करणेसाठी कार्यकारी संचालक यांना बँकेचे वेळेंत समक्ष भेटा. संबंधी सर्व माहिती ते आनंदानें पुरवतील.

वा. ग. अळतेकर, बी. कॉम., कार्यकारी संचालक.

शि. म. काळे, एम्. एल्. ए. अध्यक्ष.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८१३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.